जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०८/०७/२०२४
## दि.०७/०७/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| पो.स्टे.गुरनं./कलम | विश्रामबाग पो स्टे १६७/२०२४,भादविक ३०३(२) |
| फिर्यादी | एक महिला,वय ५५ वर्षे रा. पीएमसी बिल्डींग,औंध पुणे |
| आरोपीत | एक अनोळखी महीला (अटक नाही) |
| गु.घ.ता.वेळ व ठिकाण | दि.२६/०६/२०२४ रोजी दुपारी ११/४५ वा.सुमा. नारायण पेठ येथील, अभिजीत बिल्डीगचे खाली बेसमेंटमध्ये |
| तपशिल | यातील फिर्यादी यांना वर नमुद ठिकाणी नमुद महिलेने गर्दीमध्ये धक्का लागुन गळयातील मंगळसुत्र व चैन तुटली आहे असे सांगुन ते पर्स मध्ये ठेवण्यास सांगुन फिर्यादीची नजर चुकवुन पर्स मध्ये ठेवलेले १,००,०००/- रु.कि.चे सोन्याचे दागिणे चोरुन नेले.. |
| त.अंमलदार | पोलीस अंमलदार खरात ०२०/२४४५७७५ |

२

| | |
|---|---|
| पो.स्टे.गुरनं./कलम | कोथरूड पो स्टे १९७/२०२४ भा.न्या.सं.११८(१),३५२,११५(२) |
| फिर्यादी | एक इसम वय ५५ वर्षे रा.केळेवाडी कोथरूड पुणे |
| आरोपीत | एक इसम (अटक नाही) |
| गु.घ.ता.वेळ व ठिकाण | दि.०७/०७/२०२४ रोजी रात्रौ ००/१५ ते ००/३० वा दरम्यान बालाजी मित्र मंडळाजवळ हनुमान नगर केळेवाडी कोथरूड पुणे |
| तपशिल | यातील फिर्यादी हे घरी असताना त्यांच्या ओळखीचा नमुद इसम हे गल्लीमधुन येत असतांना फिर्यादी यांचा मुलगा हा गॅलरीमध्ये उभा होता तेव्हा त्याला नमुद इसम व त्याचा भाऊ यांच्या मध्ये भांडण चालु होते हे दिसले त्यामुळे फिर्यादी यांच्या मोठ्या मुलाने याला घरी जा भांडण करू नको असे म्हटले असता नमुद इसम याने फिर्यादी यांच्या मोठ्या मुलाला शिवीगाळ व मारहाण करून फिर्यादी हे भांडण सोडवण्यासाठी गेले असता नमुद इसम याने फिर्यादी यांना सिमेंटच्या तुकडयाने डोक्यावर मारून जखमी केले. |
| त.अंमलदार | पोलीस अंमलदार दळवी ०२०/२५३९१०१० |

३

| | |
|---|---|
| पो.स्टे.गुरनं./कलम | सिंहगड रोड पो स्टे ३९२/२०२४भा.न्या.सं.कलम ११८(१) |
| फिर्यादी | एक इसम वय ४० वर्षे रा.ब्रम्हा हॉटेलजवळ,सिंहगड रोड पुणे |
| आरोपीत | एक इसम (अटक नाही) |
| गु.घ.ता.वेळ व ठिकाण | दि.०६/०७/२०२४ रोजी रात्री २२/४५ वा. चे सुमा.दावत हॉटेल, वडगाव बुा, पुणे |
| तपशिल | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी पत्नी व मुलासह जेवण करणेसाठी गेले असताना तेथे फिर्यादी बसलेल्या टेबलचे शेजारील टेबलवर बसलेला नमुद इसम हा त्याचे सोबतचे महिले सोबत मोठ्याने बोलत असल्याने त्यास थोडे हळू बोला, मला डिस्टर्ब होत आहे असे म्हणाले असता नमुद इसमास त्याचा राग आल्याने त्याने टेबलवरील बिअरची काचेची बाटली फिर्यादी यांचे डोक्यात मारून त्यांना जखमी केले. |
| त.अंमलदार | पोलीस अंमलदार गंभिरे मो.नं. ९८२२९०९५१३ |